महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ

सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१ . दुरध्वनी क्र. ०२२-२२६२०३०४

Email: director.msbae@gmail.com

क्रमांक :- कशिमं/पाच -२०२४/३०९ दिनांक:- २६.०९.२०२४

वाचा :- १) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप/२०२४/५७, दिनांक १६.०७.२०२४.
२) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप/२०२४/२३४, दिनांक १४.०८.२०२४.
३) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप-२०२४/२६५, दिनांक ३०.०८.२०२४.
४) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप-२०२४/२४२, दिनांक ०२.०९.२०२४.
५) परिपत्रक क्रमांक कशिमं/शारेप-२०२४/२९८, दिनांक २०.०९.२०२४.

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्यामध्ये विविध ठिकाणी होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शाळेतील विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता शासनाने/स्थानिक प्रशासनाने ज्या ज्या जिल्ह्यातील शाळांना दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी सुट्टी जाहीर केली आहे. त्या त्या जिल्ह्यातील दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी होणाऱ्या एलिमेंट्री ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचे दोन्ही पेपर रद्द करुन उर्वरीत जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर वेळापत्रकानुसार परीक्षा आयोजन करण्यात आले आहे. तसेच शासकीय रेखाकला (इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये कोणताही बदल झाला नसल्यामुळे सदर परीक्षा नियमीत वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात याव्यात.

शासकीय रेखाकला (एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड) परीक्षेचे दोन पेपर ज्या जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे शाळांना सुट्टी जाहीर केली असल्याने घेता आलेले नाही. अशा संबंधित (मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व पुणे) जिल्ह्यामध्ये सदर परीक्षा रविवार दिनांक २९.०९.२०२४ रोजी घेण्यात यावी. या प्रकारच्या सूचना सर्व संबंधित विद्यार्थी/पालक/सहभागी शाळांना आपल्या स्तरावरुन देण्यात यावे. सुधारीत वेळापत्रकाचा तपशील खालील प्रमाणे.

***एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षा सुधारीत वेळापत्रक***

| क्र | विषयाचे नाव | परीक्षेची वेळ | गोपनिय प्रश्नपत्रिका केंद्राच्या लॉगइन वर पाठविण्याचा तपशील |
|---|---|---|---|
| | *रविवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२४* | | |
| १ | संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) | १०.३० ते १.०० (२.३० तास) | शनिवार दि.२८.०९.२०२४ सकाळी १०.०० वाजता |
| २ | कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) | २.०० ते ४.०० (२.०० तास) | |

वरील सुधारीत वेळापत्रकानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा आयोजन करताना दिनांक २६.०९.२०२४ रोजी संकल्पचित्र-नक्षीकाम (Design) व कर्तव्यभूमिती व अक्षरलेखन (Plane Geometry & Lettering) च्या प्रश्नपत्रिकांचा वापर दिनांक २९.०९.२०२४ रोजी होणाऱ्या परीक्षांकरिता केला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. असे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका रद्द समजण्यात येतील व याबाबतीत सर्वस्वी जबाबदारी केंद्रप्रमुखाची राहील याची नोंद घेण्यात यावी.

सदर परिपत्रक www.msbae.org.in / https://dge.msbae.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(विनोद दांडगे)
प्र.संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.

प्रति,

संबंधित केंद्र प्रमुख, शासकीय रेखाकला परीक्षा तथा मुख्याध्यापक /प्राचार्य (सर्व).

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) उपसचिव(कला), महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, नागपूर/औरंगाबाद.
२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
३) उप आयुक्त, परीक्षा परिषद, पुणे.
४) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).
६) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
७) शिक्षणाधिकारी, नगरपालिका/महानगरपालिका (सर्व)
८) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई.
९) प्राचार्य, संगीत आणि कला अकादमी, कला विभाग, बृहन्मुंबई महानगर पालिका, शिक्षण विभाग,मुंबई.
१०) जिल्हा विद्यालय निरीक्षक, (सर्व) उत्तरप्रदेश / मध्यप्रदेश / उत्तराखंड/ छत्तीसगढ.
११) निवड नस्ती.